वाचा :- १) महाराष्ट्र जिल्हापरिषद जिल्हा (सेवाप्रवेश) नियम १९६७ च्या नियम ६ (८)
२) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.जिपब -४८२०/प्र.क्र. २९०/आस्था-१४ दि.०७/०४/२०२१.
३) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, पत्र क्र. जिपब-२०२२/प्र.क्र.२९(भाग-२) आस्था-१४ दि.२४/०२/२०२३.
४) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाकडून जिल्हांतर्गत बदली झालेल्या शिक्षकांची प्राप्त यादी.
५) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग,शासन पत्र क्र. जिपब-२०२२/प्र.क्र.२९(भाग-२)/आस्था-१४ दि.४/०५/२०२३

-----/////------

जा.क्र.जिपऔ/शिक्षण/प्रावि-२/२०२३.(2004/2750
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक १५ /०५/२०२३.

**आदेश :-**

ज्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा प्रवेश अधिनियम १९६७ मधील नियम ६ (८) नुसार जिल्हा परिषद औरंगाबाद अधिनिस्त कार्यरत असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शिक्षकांची संदर्भ क्र. ०२ महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जिपब-४८२०/प्र.क्र.२९०/आस्था-१४ दिनांक ०७/०४/२०२१ मधील तरतुदीनुसार संगणकीय ऑनलाईन प्रणालीव्दारे सन २०२२ मध्ये जिल्हांतर्गत बदल्या झालेल्या आहेत. संदर्भ. क्र. ३ नुसार जिल्हांतर्गत बदली झालेल्या शिक्षकांना दिनांक ०१/०५/२०२३ ते दिनांक १५/०५/२०२३ पर्यत कार्यमुक्तीचे प्रशासकीय आदेश निर्गमित करावेत व कोणत्याही परिस्थितीत दिनांक १६/०५/२०२३ ते दिनांक ३१/०५/२०२३ या कालावधीत अशा शिक्षकांना प्रत्यक्ष कार्यमुक्त करण्याबाबतची कार्यवाही करावी असे निर्देश आहेत.

त्याअर्थी, मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद, मला प्राप्त अधिकारांचा वापर करुन संदर्भ क्रमांक ०४ मधील प्राप्त यादीतील ज्या शिक्षकांची जिल्हांतर्गत बदली झालेली आहे अशा ( १९६१ पैकी १९१३) शिक्षकांना त्यांनी पसंतीक्रमामध्ये नोंदविलेल्या ठिकाणी जिल्हांतर्गत बदलीने नियुक्ती करुन सोबत जोडलेल्या यादी परिशिष्ठातील रकाना क्रमांक ०६ मध्ये नमुद ठिकाणाहून रकाना क्रमांक ०८ मध्ये नमूद ठिकाणी उपस्थित होण्याकरीता संदर्भ क्र. ३ व ५ नुसार संदर्भ क्र ०४ मधील शिक्षकांना दिनांक १६ /०५/२०२३ रोजी कार्यमुक्त करण्यात येत आहे.

परिशिष्ठ

| अ.क्र. | नाव | पदनाम | माध्यम | बदलीपुर्वीची शाळा | | बदली झालेली शाळा | | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | युडायस क्रमांक | शाळेचे नाव | युडायस क्रमांक | शाळेचे नाव | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | ऑनलाईन बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करणे बाबतची यादी | | | | | | | |

अटी व शर्ती :-

१. वरील परिशिष्ठातील बदली झालेले शिक्षक हे बदली झालेल्या शाळेतुन दिनांक १६ /०५/२०२३ रोजी व्दितीय समयी प्रत्यक्ष कार्यमुक्त होतील व बदली झालेल्या शाळेत दिनांक १७ /०५/२०२३ रोजी उपस्थित होतील. उपस्थित न झाल्यास, असे शिक्षक नियमानुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र राहतील.
२. सदरच्या बदलीस पदग्रहण अवधी वा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
३. बदली आदेशातील शिक्षकांनी या आदेशासोबत बदली पोर्टलवरुन प्राप्त झालेली संगणकीय बदली आदेश जोडून पदस्थापनेच्या ठिकाणी उपस्थित होणे बंधनकारक आहे.
४. संबंधित शिक्षकांनी केलेल्या विनंतीप्रमाणे व त्यासाठी सादर केलेली आवश्यक कागदपत्रे सत्य आहेत, असे समजून सदर बदली करण्यात आलेली आहे.
५. जिल्हांतर्गत बदली पोर्टलवर भरलेली माहिती चुकीची आढळून आल्यास संदर्भ क्र ०२ मधील ५.१०.५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.
६. राजकीय व इतर दबाव तंत्राचा वापर केल्यास संदर्भ क्र. ०२ मधील ५.३ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

विकास मीना,भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद

Letter 01-D-2

प्रतिलिपी,

1) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद.
2) गटविकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
3) गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती (सर्व) यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
4) मुख्याध्यापक, जि.प.के.प्रा.शा./प्रशाला ---------ता.-------------- यांना देवून कळविण्यात येते की, संबंधितास कार्यमुक्त व उपस्थित करुन गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे अहवाल सादर करणेस्तव.
5) संबधितास.

विकास मीना,भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद औरंगाबाद

Letter 01-D-2